# आसाम ते गुजरात आणि कर्नाटक ते हरयाणा : आगामी सणासुदीच्या काळासाठी फ्लिपकार्टने आपली पुरवठा साखळी केली मजबूत

- देशभरात नवी ६६ फुलफिलमेंट आणि सॉर्टेशन केंद्रे, १० दशलक्ष चौरस फूट आणि २० दशलक्ष घनफूट आकाराच्या या जागांचा साठवणुकीसाठी वापर
- १००० वितरण केंद्रांचा समावेश करत शेवटच्या टप्प्यापर्यंतची वितरण व्यवस्था मजबूत, देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत व्याप्ती वाढवली, किराणा *दुकानदारां*बरोबरच्या भागिदारीचाही विस्तार
- संपूर्ण पुरवठा साखळीत १,१५,००० अतिरिक्त हंगामी नोकऱ्या व त्यात सर्वसमावेशक नोकरभरतीचा वाटा १५ टक्के

बेंगळुरू – **१५ सप्टेंबर २०२१ :** फ्लिपकार्ट या भारतातील एतद्देशीय ई- कॉमर्स बाजारपेठेने देशभरातील आपली पुरवठा साखळी अधिक मजबूत करत तिचा विस्तार केला आहे. आगामी सणासुदीच्या काळानिमित्त ऑनलाइन खरेदी करू इच्छिणाऱ्या लाखो ग्राहकांच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि लाखो एमएसएमईज, विक्रेते, कारागीर आणि किराणा दुकानदारांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा हेतू त्यामागे आहे. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून फ्लिपकार्टने आसाम, छत्तीसगड, हरयाणा, कर्नाटक, महाराष्ट्र, ओडिशा, पंजाब, राजस्थान, तमिळ नाडू, तेलंगणा आणि पश्चिम बंगाल अशा देशातील विविध राज्यांत मिळून ६६ नवी, मोठी फुलफिलमेंट आणि सॉर्टेशन (भरणा आणि वर्गवारी) केंद्रे सुरू केली आहेत.

त्याशिवाय फ्लिपकार्टने देशभरात १००० हून अधिक नवी अतिरिक्त वितरण केंद्रे (डीएच) सुरू करत शेवटच्या टप्प्यापर्यंतच्या व्यवस्थेचा आवाका (लास्ट माइल रीच) विस्तारला आहे. बिग बिलियन डेजची व्याप्ती आणि गुंतागुंत लक्षात घेता क्षमता, साठवणूक, वर्गवारी, पॅकेजिंग, मानव संसाधन, प्रशिक्षण आणि वितरणासाठी गुंतवणुकीची गरज असते व त्यातून सणासुदीच्या काळात अतिरिक्त रोजगार निर्मिती करण्यास मदत होते. फ्लिपकार्टने आपल्या 'लास्ट माइल डिलीव्हरी' उपक्रमाअंतर्गत किराणांबरोबरची भागिदारी आणखी दृढ करून त्यांना तंत्रज्ञानावर आधारित डिजिटल यंत्रणेत समाविष्ट केले आहे. यंदा फ्लिपकार्ट १,१५,००० पेक्षा जास्त लोकांसाठी थेट हंगामी रोजगार निर्मिती करत असून त्यामध्ये १५ टक्के स्त्रिया व दिव्यांग व्यक्तींचा समावेश आहे.

देशाच्या सर्वसमावेशक आर्थिक विकासातील ई- कॉमर्सच्या भूमिकेविषयी **फ्लिपकार्ट समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी कल्याण कृष्णमूर्ती** म्हणाले, 'ई- कॉमर्स ही एक मोठी ताकद असून तिने विक्रेते तसेच ग्राहकांना समान उपलब्धता व मूल्य मिळवून दिले आहे. ई- कॉमर्सच्या पुरवठा साखळीची पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञानावर आधारित डिजिटल यंत्रणा लाखो रोजगार तयार करत असंख्य संधींच्या निर्मितीत, पारंपरिक गोदामांचे विश्वासार्ह व तंत्रज्ञानावर आधारित जागेत रुपांतर करण्यात, लाखो स्थानिक विक्रेते, एमएसएमईज, किराणा, शेतकरी आणि वंचित समाजाला राष्ट्रीय बाजारपेठेशी जोडण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. फ्लिपकार्ट आपल्या पूर्ण क्षमतेसह भारतात संधी तयार करत असून उद्योगक्षेत्र व अर्थव्यवस्थेला चालना देत आहे तसेच आमचे विक्रेते, कारागीर आणि विणकरांना देशातील दुर्गम भागात वितरण

करण्यासाठी मदत करते. पायाभूत सुविधा निर्मिती, रोजगार निर्मितीवर लक्षणीय परिणाम घडवून आणण्यासाठी आणि उद्योजकतेची यंत्रणा तयार करण्यासाठी आम्ही बांधील आहोत.'

या सणासुदीच्या काळात देशभरातील लाखो विक्रेत्यांना पाठिंबा देण्यासाठी पुरवठा साखळीची व्यापकता वाढवणे आणि ग्राहकांना असामान्य अनुभव मिळवून देण्यासाठी त्यांना मदत करणे आवश्यक आहे. पुरवठा साखळीच्या विस्तारातील फ्लिपकार्टचे प्रयत्न एकीकडे विक्रेत्यांना मदत मिळवून देत आहेत, तर दुसरीकडे देशात लाखो प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार तयार करत आहेत.

देशभरातील आपल्या पुरवठा साखळीमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांची सुरक्षा व स्वास्थ्याला फ्लिपकार्ट सातत्याने प्राधान्य देत असून कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांच्या लसीकरण तसेच कोविड-१९ सुसंगत उपाययोजनाही करत आहे.

**२०२१साठीच्या प्रमुख पुरवठा साखळी विस्तारात पुढील बाबींचा समावेश आहे -**

- ब्रँड भागिदारांकडून १०० पेक्षा जास्त सुविधांचा समावेश करण्यात आला असून त्यामुळे ग्राहकांना जलद वितरण मिळण्यास मदत होईल.
- १,००,००० किराणा भागिदारांचा समावेश करत वितरण भागिदारांसाठी किराणाची पर्यायी व्यवस्था अधिक मजबूत करण्यात आली आहे.
- देशभरातील कित्येक थर्ड- पार्टी लॉजिस्टिक्सबरोबर काम करत वितरण वेगवान करण्यात आले आहे तसेच अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीही करण्यात आली आहे.
- १७,७०० पिन कोड्सवरील ग्राहकांना जीव्हजच्या माध्यमातून आणि मोबाइल, मोठी उपकरणे, फर्निचर, आयटी उपकरणे यांच्यासाठी ८,००० प्रशिक्षित सेवा तंत्रज्ञाच्या मदतीने ग्राहकांना सेवा दिली जात आहे.

गेल्या बऱ्याच महिन्यांपासून ई- कॉमर्सने व्यवसायांचे पुनरूज्जीवन करून त्यांची आर्थिक बाजू पूर्वपदावर आणण्यात, ग्राहकांना सुरक्षित व निर्जंतुक पद्धतीने उत्पादनांचे वितरण करण्यात आणि रोजगार निर्मितीत विविधांगी परिणाम घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सणासुदीच्या काळासाठी फ्लिपकार्टने केलेली गुंतवणूक संपूर्ण यंत्रणेसाठी आणखी लाभदायक ठरेल.

## About the Flipkart Group

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, Flipkart Wholesale, and Cleartrip. The Group is also a majority shareholder in PhonePe, one of the leading Payments Apps in India.

Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's digital commerce revolution, with a registered customer base of more than 350 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem, and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired

us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with its group companies, Flipkart is committed to transforming commerce in India through technology.

For more information, please contact media@flipkart.com